## ‘ प्रेसनोट’

दिनांक : २५/०२/२०२६

| | |
|---|---|
| **युनिट** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव, पद, वर्ग व कार्यालय** | १) गोपाल देविदास चारथळ, वय ५० वर्ष, ग्रामविकास अधिकारी, ग्रा.पं.कान्होली ता.दर्यापुर जि.अमरावती (वर्ग ३) रा.प्रसाद कॉलनी शिवतारा बार रोड अमरावती २) पदमाकर साहेबराव राउत, वय ५२ वर्ष, ग्रा.पं.सदस्य ग्रा.प.कान्होली रा. कान्होली ता.दर्यापुर जि.अमरावती ३) मोतीराम गोंडुजी कोल्हे, वय ६८ वर्ष व्यवसाय शेती रा.अशोक नगर,प्रभाग क्रं.५ दर्यापुर (खाजगी व्यक्ती) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ४०,,०००/— रु. |
| **तडजोडी अंती मागणी केलेली लाचेची रक्कम** | ३०,०००/—रु |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३०,०००/—रु |
| **घटनास्थळ** | लक्ष्मी झेरॉक्स सेंटर जवळ कोर्ट चे समोर दर्यापुर |
| **घटना तारीख व वेळ** | दि.२५/०५/२०२६ चे १४.३२ वा. ते १४.४३ वा.दरम्यान |

थोडक्यात हकीकत :— दि.१७/२/२०२६ रोजी तक्रार प्राप्त झाली की, तक्रारदार यांनी ग्रा.प.कान्होली अंतर्गत जनसुविधा २०२४—२०२५ या लेखाशिर्षक अंतर्गत सिमेंट कॉक्रेट रस्ता बांधकामाचे काम घेतले होते. सदर काम हे पुर्ण झाले असुन सदर कामाचे एकुण ८ लाख रुपये बिलापैकी ३,८०,००० रुपये हे तक्रारदार यांना प्राप्त असुन उर्वरीत बिल ४,२०,००० रुपये वाकी असल्याने सदर बिल काढुन देण्याकरीता १) गोपाल देविदास चारथळ, ग्रामविकास अधिकारी, ग्रा.पं.कान्होली २) पदमाकर साहेबराव राउत, ग्रा.पं.सदस्य ३) मोतीराम गोंडुजी कोल्हे, (खाजगी व्यक्ती) यांनी तक्रारदार यांना ४०,००० रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि.१८/२/२०२६ रोजी पडताळणी क्रं.१ व २ तसेच दि.२३/२/२०२६ पडताळणी क्रं.३ केली असता, आरोपी क्रं.१,२व ३ यांनी तक्रारदार यांना त्यांचे कामाचे उर्वरीत बिल काढुन देण्याकरीता तडजोडीअंती ३०,००० रुपये लाचेची मागणी केल्याचे तसेच आरोपी क्रं.१ यांनी आरोपी क्रं.२ यांना पैसे देण्याकरीता सहमती दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आज दिनांक २५/२/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान ३०,००० रुपये लाचेची रक्कम ( ज्यामध्ये ५०० रुपयाच्या ३६ नोटा व उर्वरीत खेळण्यातील नकली नोटा) आरोपी पदमाकर राउत व मोतीराम कोल्हे हे सोबत असतांना आरोपी क्रं.२ यांचे सांगणेवरुन आरोपी क्रं.३ मोतीराम कोल्हे यांनी लक्ष्मी झेरॉक्स सेंटर दर्यापुर येथे स्विकारली. वरुन आरोपी कं.२ व ३ यांना घटनास्थळावरुन व आरोपी क्रं.१ यांना त्यांचे राहते घरुन ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पो.स्टे.दर्यापुर अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती चे पोलीस अधीक्षक श्री.बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक श्री.सुनिल किनगे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि..चित्रा मेसरे, पो. नि,ज्ञानोबा फड पो.हे.कॉ.प्रमोद रायपुरे, पो.शि.शैलेश कडू, वैभव जायले, म.पो.हवा वंदना खंडारे चालक पो.उप.नि.सतीश किटूकले व चालक राजेश बहिरट यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— १) श्री.बापू बांगर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.नं.९०११३२३४२६
२) श्री.सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.नं. ९७६४२१०४८५
३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.नं. ९८२३१११५५, ७५१७५७१०६४

कार्यालयाचा पत्ता :— अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, ललीत सेंटर परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्रमांक :— १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१—२५५३०५५

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

( चित्रा मेसरे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंध अमरावती.